
# प्रकरण ४

# उत्कट जीवघेण्या धगीवर

# उत्कट जीवघेण्या धगीवर

प्रज्ञा लोखंडे



# प्रकरण ४

# उत्कट जीवघेण्या धगीवर

आधुनिक मराठी कवयित्रींमध्ये विशेष स्थान असणाऱ्या प्रज्ञा लोखंडे या कवयित्री आहेत. त्यांच्या कवितेचा रुपबंधात्मक कल मुळात स्त्री वेदनेशी निगडीत आहे. त्यांनी आपल्या कवितेतून स्त्री मनाचा, संवेदनांचा अत्यंत सखोलपणे चिंतनशील विचार केला आहे. हया पार्श्वभूमीवर प्रज्ञा लोखंडे यांच्या कवितेमागील प्रेरणांचे आकलन करुन घेणे आवश्यक ठरते. मानवी जीवनातील महत्वपूर्ण घटकांना प्रज्ञा लोखंडे यांची कविता स्पर्श करते. स्त्री ही केवळ स्त्रीच असत नाही प्रत्येक वेळी, मात्र तरीही फक्त बाई म्हणून तिचं अस्तित्व धोक्यात येतं

"मी होते माइऱ्यातच म्यान
शुभ्र व्याकूळ वाहण्यातला
प्राणंतिक बांध..... कालवा वाढतो
आतला, बाहेरचा तळ उदसतो."

(उत्कट जीवघेण्या धगींवर , पृ.२७)

स्त्री दुःखाचा वेधक अर्थ त्यांच्या काव्यातून प्रतीत होतो. आधुनिक काळातील कवयित्रींनीही आपल्या काव्यलेखनामागे हाच उद्‌देश ठेवलेला दिसतो. आधुनिक कवितेबद्‌दल गंगाधर पाटील लिहितात. "पुरुष प्रधान संस्कृतीत स्त्रीचे शारीरिक व मानसिक पातळीवरुन अनेक प्रकारे शोषण चालले आहे. या शोषणाविरुध्दची जाणीव आजच्या विशेषतः स्त्री साहित्यात नवे रुप घेऊन व्यक्त होत आहे."[१] म्हणूनच स्त्री भावविश्व साकारताना या कवयित्रींची कविता एक वेगळाच काव्यानुभव देते. त्याचप्रमाणे प्रज्ञा लोखंडे यांची कविता स्त्रीभावविश्व साकार करतानाच समाजजीवनातील काही महत्वाच्या घटनांकडेही चिकित्सक वृत्तीने पाहते.

प्रज्ञा लोखंडे यांच्या कवितेला मिथकांचे वावडे नाही. परंतु मिथक, प्रतिमा आणि प्रतीके यांचा अनाठायी उपयोग त्यांनी आपल्या काव्यातून टाळलेला आहे. 'उत्कट जीवघेण्या धगीवर' या काव्यसंग्राहची प्रमुख भूमिका ही स्त्रीत्वाच्या आत्मपीडेची प्रखर जाणीव व्यक्त करणे ही आहे. त्याबरोबरच स्त्री—पुरुष संबंधातील संपत जाणारे नातेपण आणि त्या नात्यांमधील फोलपणा रितेपणा अधिकाधिक स्पष्ट होतो. या काव्यसंग्रहात जवळपास सत्तर कविता समाविष्ट केलेल्या आहेत.

## अ) स्त्रीत्वाच्या संघर्षाची आत्मपीडा प्रखरतेनं मांडणारी कविता :

आधुनिक कवयित्रींमध्ये वैशिष्टयपूर्ण काव्यलेखन करुन आपला स्वतंत्र ठसा निर्माण करणाऱ्या कवयित्री प्रज्ञा लोखंडे! त्यांच्या कवितेची नाळ स्त्रीशी स्त्रीच्या अस्तित्व वेदनेशी अगदी सुरुवातीपासूनच जुळलेली आहे. प्रज्ञा लोखंडे यांची संवेदनशीलता स्त्रीत्वाचा मूक आक्रोश बघून दु:खव्याकुळ होते. पिढयान्‌पिढयांची माता असलेल्या आपल्या महान संस्कृतीचा जोहरापासून सतीपर्यंतचा प्रवास म्हणजे इक्कीसवी सदीपर्यंत स्त्रीला दुभंगत नेणाऱ्या धगधगीत दु:खभोगाचे प्रतिबिंब आहे. त्यांचे हे मूक रक्ताळलेपण प्रज्ञा लोखंडे यांच्या कवितेत उत्कटपणे प्रतीत होते. त्यांना रुपकुँवरसारख्या सतींची कत्तलखान्याकडे निघालेली रंगीत मिरवणूक दिसते. स्त्रीच्या कपाळी सटवाईनं गोंदलेलं अभावाचं लालजर्द हिलाल दिसतं, स्त्रीमधील एका वेल्हाळ पोरीला असह्य वेदनेनं नासऊन टाकलेलं दिसतं, एके काळच्या अल्लड पोरीची दु:खाच्या थारोळयात मरत चाललेली ईव्हा दिसते. बाईने आयुष्यभर सोसलेल्या दु:खाचा जाच त्यांना दिसतो तसेच निरंतर साहिलेल्या वासनेचा गळामिठीचा काच दिसतो. चटक्यांचा, वणव्यांचा अपार इतिहास डोईवर घेऊन फिरणारी स्त्री त्यांना दिसते. तर कधी शतकानुशतकं भाकऱ्या थापणारी उष्टी खरकटी काढणारी स्त्री त्यांना दिसते. फक्त पुरुषाच्या वंशाला दिवा देणारी एक सस्तन मादी त्यांना दिसते तर कधी स्वत:च्या बेटीलाही थरथरत्या हाताने बुरखा देणारी, कुराणाचे काही चार आयते फक्त बंद भिंतीतच म्हणू शकणारी अमिना त्यांना स्त्रीविश्वाच्या चिरेबंदी काळोखाचे प्रतीक वाटते. प्रज्ञा लोखंडे यांनी आपल्या काव्यलेखनाच्या माध्यमातून असंख्य स्त्रीत्वाच्या आत्मपीडेची जाणीव व्यक्त केली आहे.

वर्षानुवर्षाचा हिशेब करताना कवयित्रीचे मन भूतकाळात जाते. गावकुसाबाहेरची खुळखुळयाची काठी त्यांना आठवते, येसकरकीची पाळी आठवते. चाऱ्या, डल्ल्या, गुडसा, ढोलकं, कांडं , संबळ, सरबा, मोळया, विळी कोयता असा अख्खा लसलसता भूतकाळ डोळयांसमोर उभा रहातो. अशा भावावस्थेत मग व्यष्टी समष्टीच्या चक्राचं तत्वज्ञान क्रूर रुपानं सुरु होतं. आणि मग गुलाम शरीराला नव्या कोऱ्या अस्खलित जन्माचा हव्यास सुरु होतो-

'यच्चयावत अभावातून वरवर सरकणारा जिना अस्तित्वाचा
गच्च वस्तूंनी मध्यमवर्गीय गरजांनी लदबदलेलं घर
समष्टीचं क्रूर जाळं आत-बाहेर
नवरा मुलगा प्रियतम

जिवलग सोयरे सकळ
सुरक्षिततेची बेहद्द नशीली झिंग...
मेंदूतल्या शुभ्र वळयांना झुगारण्याऱ्या
गुलाम शरीराला हवाय
नवा कोरा अस्खलित जन्म.....”

(उत्कट जीवघेण्या धगीवर पृ. १)

गुलाम शरीराला हव्या असलेल्या नव्या कोऱ्या अस्खलित जन्माचा शोध प्रज्ञा लोखंडे यांची कविता घेते.

*कवितेतून व्यक्त होणारा सखीभाव :

“कविता होऊ शकत नाही पर्याय
जगण्याला किंवा
जगण्याच्या एखादया तुकडयाला
हे ठाऊक असूनही ... मी
कवितेकडेच पुन्हा पुन्हा वळते.”

(उत्कट जीवघेण्या धगीवर पृ.२)

कविता निरंतर आपल्यासोबत आहे ही भावना संवेदनशील मनाला धीर देत असते. नित्याच्या जगण्यातून कविता आविष्कृत होत असते. कविता ही प्रज्ञा लोखंडे यांची सखी झाली आहे. कविता तिचे नितळ निर्मळ पाणी काठोकाठ भरुन कातळगर्भातून वहात राहते. ते वहाणं जगण्यालाच तृषार्त करत राहते. याहीपेक्षा ‘बाई असण्याच्या उत्कट जीवघेण्या धगीवर कविता सोबत असते’ हे कवितेवरचे भाष्य प्रज्ञा लोखंडे यांच्या काव्यानिष्ठेची साक्ष देते.

“ कधीपासून तू आहेस
माझ्या
भावना संवेदना तृष्णेच्या
टोकदार बिंदूवर
प्रज्ञा करुणेच्या
अपरंपार गाभ्यावर

बाई असण्याच्या
उत्कट जीवघेण्या धगीवर
बाईपणाच्या कवचाला भेदणाऱ्या
लखलखत्या अणुरेणुवर"

(उत्कट जीवघेण्या धगीवर पृ.४)

मुखवटे घातलेल्या या विश्वात जेव्हा गुदमरायला होतं, सोंगाढोंगाच्या बेदिली समाजाचा कंटाळा आल्यावर कवयित्रीला कविताच सहकार्याचा हात देते. मरगळलेल्या अवस्थेत सोहार्दाचे रोमांच उभे करते, वेदनेच्या त्रेपन्नाव्या अक्षराला जन्म देऊन दिवसेंदिवस अवघड होत जाणाऱ्या आयुष्याला दशांगुळे वर नेते. 'तू आहेस' 'तू असतेस' ही कवयित्रीची भावना कवितेमध्ये मानवी मनाचे विभ्रम शोधते कविता पूर्ण नैतिक आहे असे सांगून ती पूर्ण स्त्रीचे रुप आहे असं सांगताना कवयित्री 'स्त्री' मधलं आदिशक्तीपण प्रकट करते. 'कविता ही शांत ठेवणारी आत आत शांत ठेवणारी संपूर्ण स्त्री आहे' असे सांगताना प्रज्ञा लोखंडे म्हणतात.

"बघता बघता
रक्तात ठाणच मांडून बसते कविता
मेंदू, हदय, गर्भाशय
थेट गाभ्यापर्यंत जाऊन
गाभाच होते कविता"

असं म्हणतं असतानाच कविता लिहूनही उरणारी तगमग कवियित्रीला असहय करुन टाकते. कवयित्रीच्या चराचराला व्यापून राहणारी कविता कधी तिला टोकदार दुःखानं, दुखऊन जाते तर कधी स्वतःलाच ओढून नेणारी कविता कवयित्रीचे काळीज पोखरुन उरते. यातनांच्या घनदाट वारुळात अडकून पडल्यावर आणि एकांतिक सजा ठोठावली जात असताना ऐन सोळाव्यात कवयित्रीच्या अंतःप्रेरणेतून तिच्या पडझडीची कविता निर्माण होते. आणि कवयित्री जेव्हा आसूड ओढणाऱ्या प्रतिमांचा चाबूक गहाण ठेवते तेव्हा काळोखाला सजा देणारा कवितेचा सूर हलकेच विरुन जातो. प्रज्ञा लोखंडे कवितेलाच आपलं जीवन सर्वस्व मानतात कारण त्यातून त्यांचचं अंतर्याम जागं होतं.

"मी होते
माझ्र्यातच म्यान
शुभ्र व्याकुळे वाहण्याला

प्राणांतिक बांध
कालवा वाढतो
आतला बाहेरचा
तळ उदसतो...
..... ही संज्ञा असते
माझ्या समग्रतेची
तु आहेस माझं समग्र"

(उत्कट जीवघेण्या धगीवर पृ २७)

कविताच आहे. कवयित्रींचं समग्र। कारण तिच्यातूनच जीवनाच्या विविध पैलूंचा शोशोध कवयित्री घेऊ शकते.

*स्त्रीत्वाची प्रखर आत्मपीडा :

प्रज्ञा लोखंडे यांच्या कवितेतून स्त्रीच्या जगण्याची घुसमट धीरगंभीर पणे व्यक्त होत रहाते. स्त्री ही फक्त स्त्रीच असत नाही, प्रत्येकवेळी. पण फक्त बाई म्हणून तिचं अस्तित्वं धोक्यात येतं. सीमॉ द बोव्हा म्हणतात 'She is not born but rather becomes a women'[९] म्हणजे कुणी फक्त स्त्री म्हणून जन्माला येत नाही. परंतु नंतर तिला स्त्री बनवलं जातं. असं बाईपण स्त्रीला जन्मापासून वागवावं लागतं आणि दुःखाच्या काटेरी कुंपणात ओरबडून घ्यावं लागतं. कवयित्री प्रज्ञा लोखंडे यांच्या कवितेचं इथल्या स्त्रीचं जीवन हेच विचार प्रक्रियेचं स्त्रोत्र आहे. अगदी अनादी काळापासून राबणारी बाई हा त्यांच्या कवितेचा मुख्य विषय आहे. शतकानुशतकं बाई तीच तीच कामं करत आली आहे 'रांधा वाढा उष्टी काढा' तिच्या दुःखाचं धुणं संपता संपत नाही. सूर्याच्या तुकडयावर ती स्वतःला वाळत घालते. बाईच्या रक्ताला पालवी फुटण्याची, तिची पाळी चुकण्याची प्रक्रिया अखंड चालूच आहे. अनावर घुमसणाऱ्या दुःखाच्या पावसातच तिचं प्रसवणं वेळोवेळी चालू आहे. प्रज्ञा लोखंडे यांच्या कवितेतील स्त्री स्वतःचाच शोध घेत रहाते.

"बाई शोधते तिचा हरवलेला चेहरा
बाई शोधते तिचं हरवलेलं ाशरीर
बाई शोधते तिची फक्त तिची सावली
अंतर्बाहय रिकामी होत
बाई शतकानुशतकं

## चौकोनी गुहेचं माप ओलांडते "

(उत्कट जीवघेण्या धगीवर पृ ७०)

शतकानुशतकं आपला हरवलेला चेहरा आता बाई शोधू लागली आहे. तरीही चौकोनी गुहेचं माप ओलांडून तिला संसारचक्रात स्वतःला गुरफटून घ्यावच लागतं. तसंच देहमनाची असीम, अपरंपार आभा मागणारी ती भुकेली आहे. कित्येक शतकांपासून प्रज्ञा लोखंडे म्हणतात की स्त्रीची पुरुषसत्ताक दहशतीच्या पंज्यात प्राणंतिक घुसमट होते. पुरोगामी बाशिंगात आणि नरम्मादीच्या पंरपरागत वेष्टनात ती अडकून पडते. तिला त्यातून बाहेर पडताच येत नाही. म्हणूनच प्रज्ञा लोखंडे लिहितात

"पुन्हा पुन्हा रुजवते ती मनस्वी यातनांचा तुकडा,<br>
गाते आदिमं प्रसवाची अंगाई<br>
नि तिचं प्रदीर्घ रितेपण<br>
उचंबळतं<br>
शतकाच्या दखलपात्र वर्तमानावर"

(उत्कटजीवघेण्या धगीवर पृ ७६,७७)

प्रज्ञा लोखंडे दुःखित स्त्रीला सांगतात की किती सहन करणार आहेस हे देहमनाला चरत जाणारं दुःख? तुझ्या एकटेपणाच्या पडझडीत तू सामाऊ शकणार नाहीस कारण तुझा वाऱ्यावर फडफडणारा मोकळा पदर आहे आणि कधीही संपणार नाही अशा तृष्णेची फुलं वेचणारे हात तुझ्याजवळ आहेत. म्हणूनच जे दिलं जातं ते अवश्य घे. दुःखालाच कवटाळून बसू नकोस. प्रज्ञा लोखंडे यांनी स्त्रीमनाच्या दुःखाला तिच्या अंतःकरणात फुललेल्या ठिणगीला नदीचे प्रतीकात्मक रुप मानले आहे. जीवनमार्गात येणारे कातळ, निर्जिव वळणे टाळत स्त्रीला पुढे जावं लागतं. पाण्याचा भोवरा फिरत असला तरी वर खाली उसळून झेपावच लागतं. स्त्री दुःखाला परिसीमाच नाही.

प्रज्ञा लोखंडे यांच्या कवितेतील स्त्रीच्या भोवती भयाणतेचा गारठलेला कातर अंधार अधिकच भिनत जातो. जिवाच्या आकांताने दिलेल्या हाका अभेदय भिंतीवर आदळून लुप्त होतात. प्रज्ञा लोखंडे यांना प्रश्न पडतो की स्त्रीच्या जीवनात ही अपार कल्लोळाची भिंत का तयार होते? आणि तिच्यात उरलेली व्याकुळ धुगधुगीही कुठे तरी हरऊन जाते. कारण या कवयित्रीला माहित आहे की हे दुःख फक्त आजचं आणि तिच्या एकटीचंच नाही. प्रज्ञा लोखंडे म्हणतात

"ही मुळांना लगडून असलेली<br>
मातीही नाही फक्त माझी

कालची...
शतकानुशतक
या जमिनीवर कोरलीय
स्वीत्वाची
नित्यनूतन नग्नं दाहक सावली
उद्याची"

(उत्कट जीवघेण्या धगीवर पृ-४७)

म्हणूनच कुठेतरी हरऊन न जाता या विराट झुंजीशी इमान राखता यावे अशी इच्छा कवयित्रीला होते. बाईनं आजवर काय काय अन् किती किती सहन केलं. पण तरीही ती अंतर्बाहय चैतन्यानं सळसळतच राहिली. कवयित्रीला प्रश्न पडतो की असलं अनोखं रसायन या बाईनं आणलं कुठून? बाईनं संपूर्ण हयातभर हिंस्त्र काळोखाचा जाच सोसला तसंच निरंतर तडफडून वासनेच्या गळामिठीचा अपार काच साहिला. आणि तरीही तिनं हरऊ दिलं नाही स्वतःला ... स्वतःतल्या करुणेला. खरंच असं हिरव्या चैतन्यानं पाझरणारं अनोखं रसायन या बाईनं शतकानुशतकं आणलं कुठून?
आणि कवयित्रीला आणखी एक प्रश्न पडतो की बायकांना अलिकडे काय झालयं? त्यांना आपल्या बाईपणाचा विसर पडलाय का? कधीच नव्हत्या इतक्या आक्रमक होऊन हवा पाणी आणि जमिनीइतकं गृहीत असणारं त्यांचं बाईपण त्या नाकारत आहेत. उगीचच कढ आवरीत उसासे सोडणं त्यांनी केव्हाच सोडून दिलंय आणि स्वतःच्या इच्छा-अपेक्षा, वासना-लालसा त्या उत्कटपणे प्रकट करतात संपूर्ण उत्कट प्रेम तर त्या करतातच पण कधी स्वतःतही आत्ममग्न होतात. शतकानुशतकं दुःखाच्या खाईत लोटलेल्या बायकांच्यातील हा बदल कवयित्रीला सुखावह वाटतो. दास्यात अडकऊन ठेवणाऱ्या मनुला वाकुल्या दाखवतं बायका मुक्त निर्भर हसू उधळत राहतात.

स्त्री दुःखाच्या विविध छटा या कवितांधून प्रतीत होतात आणि त्यातून मार्ग काढण्याचाही प्रयत्न कवयित्रीने केलेला आहे.

## *स्त्री दुःखाच्या विविध प्रतिमा :

कवयित्री प्रज्ञा लोखंडे यांनी स्त्री दुःखाची सुरुवात तिच्या बाईपणाच्या उगमातच आहे असे म्हटले आहे. महाभारतातील कुंती ही पुराणकालीन दुःखप्रतिमा होती. कवयित्री म्हणते की माझ्या संपूर्णतेची दुःखाची लवलवती धार कुंती तुझ्यातूनच उगम पावते असं कुणी म्हणेल पण ते खरं नाही कारण माझ्या जमिनीला जिवंतपणाच्या रुजलेला धर्म व्यापून आहे. कुंतीच्या अंशाचे फक्त निमित्त होते. माझ्या धगधगत्या

लालसर सुर्याचा गोळा कवटाळण्याला! बाकी दु:ख प्रत्येकीचं जन्मापासूनचंच! तसेच ज्ञानेश्वरादी भावंडांची बहिण मुक्ताबाईला उददेशून कवयित्री म्हणते :

"मुक्ताई !
तू या अंतहीन मिथकातून मुक्त झालीस
लावला नाहीस तृष्णेला कौल
उघडली नाहीस कधी गर्भागाराच्या आस्थेची ताटी
उमललीस तरीही फुलाइतकी सहज होऊन
दर्वळलीस सृजनाच्या कोषातून
अवघ्या अस्तित्वाला मग्न--विभोर करणारी
कुठली शेज तुला सापडली....मुक्ताई ?"

(उत्कट जीवघेण्या धगीवर पृ ६२)

चारचौघींसारखा संसार आणि मागोमाग येणारी प्रापंचिक दु:ख वेदना मुक्ताबाईच्या जीवनात आली नाही. तुझी मजा नि माझी सजा म्हणत नवऱ्याला शिव्या हासडणारी अनंत काळची माता, मिटून गेलीत तिची गात्रं अपार शिणवटयानं बाईपणाचा अनादि भोगवटा मुक्ताईच्या वाटयाला आला नाही. तरीही ती फुलाइतकी सहज सृजनाच्या कोषातून दरवळत राहते असे कवयित्रीला वाटते.

वैधव्याचे दु:ख सोसणारी स्त्री ही प्रज्ञा लोखंडे यांच्या कवितेतून आली आहे. पतीमरणामुळे बाईच्या घराला ओसाड कळा आली. मरणाचाच भकास वास घरात भरुन राहिला. उदास तडफड, गच्च सन्नाटयातून जाणवते आणि स्वत:लाच विधवा स्त्री प्रश्न विचारते की हे कसं झालं? हातात हात गुंतलेला सुटला कसा? आणि आता असं सुनं सुतकी कपाळ कुठवर वागवायचं? अशा उदासून गेलेल्या स्त्रीला कवयित्री दिलासा देऊ पाहते. आता आवरन्सावर म्हणते. आणि तुझ्या माथ्यावरचे घनघोर ऊनही संपेल आणि तुला हलकंस वाटेल पण तू एक कर

"बाई ग तरशील तेवढी उरशील
विरघळशील तशी गाम्यात उत्तरशील
सांधशील ते नशीब घडवशील."

(तेवढी उरशील पृ. ६०)

अशी अर्थघनता व सौंदर्यशीलता त्यांच्या काव्यात सहजेतेने येते. तसेच समाजात वावरताना खंबीरपणाचं बळ ही कवयित्री या विधवा स्त्रीला देते. तुला कुठलाही पर्याय उरला नाही असं समजणारे समजेनात का पण तू ही ताऊन सुलाखून निघालेली बन

आणि नजरेतलं स्फटिक फक्त जप. त्यामुळे कुणी तुझ्याकडे वाकडया नजरेनं पाहणार नाही.

समाजानं नाकारलेल्या स्त्रीचं वेश्येचं जीवन प्रज्ञा लोखंडे यांना अस्वस्थ करुन सोडते. तिनं आपणहून स्वतःचं आयुष्य माडीवरच्या खिडकीत टांगलं आहे कारण नात्याच्या काटेरी कुंपणानं तिचं आयुष्य ओरबाडून टाकलं आहे असं कवयित्री म्हणते

" मी हळूच पाहिलं
तिच्या डोळयात
कसलीच गजबज नव्हती तिथं
सारं काही सहज घडावं तसं
बाईपणापासून आईपणापर्यंत
तिच्या शरीराला कुरतडणारी
माणसांची रांग
माझ्या मनात प्रश्नांची
जीवघेणी उलाघाल....."

(सावली पृ ७१)

प्रत्येक रात्रीचा विद्रुप चेहरा तिच्या आयुष्यात दुःखाचे कढ आणत राहतो. परंतु कवयित्रीची असंख्य प्रश्नचिन्हं तिच्या जगण्याची सुटका करु शकत नाहीत. माथ्यावर एकही छत्र नसणारी वेश्याच खरोखर एकमेव प्रामाणिक निघाली असं कवयित्री म्हणते. भौतिकालाच आध्यात्मिक मानणारी आणि त्यापलिकडच्या अलवार जगाला मिथ्या समजणारी ती एकमेव स्त्री आहे. कवयित्री म्हणते की

" मी देऊ लागते तिला
भूक आणि भाकर
यामधली चिरंजीव जागा
दारिद्रयाच्या पाकळया गळून पडलेलं
निस्सीम वासनेचं फूलं
मी देऊ लागते तिला
प्रेम नावाचा भ्रम नसलेला चेहरा
तिच्याइतका आदिम

तिच्याइतका नवा"

(माथ्यावर एकही ढग नसलेल्या पृ.६७)

'जनननखान्याच्या तळाला' या कवितेतून कवयित्रीने भटक्या विमुक्त स्त्रीचे दु:ख प्रकट केले आहे. या कवितेतील स्त्री ही स्त्रीत्वाची कोणतीही नाजूक लक्षणे नसलेली स्त्री आहे. वाळवंटातल्या सूर्यासारखं तिची जीवन तप्त झालं आहे. अनवाणी पायांनी हरवलेल्या शेळयाऱ्गायी शोधत उंच टेकडया, पहाडं, मैदानातून ती वणवण भटकत आहे. उन वाऱ्यात उघडयावर नवा जीव जन्माला घालून दगडानं नाळ ठेचून मातीत पुरणारी अशी अगतिक अशी ती स्त्री आहे. प्रज्ञा लोखंडे म्हणतात

"चटक्यांचा वणव्याचा प्रदीर्घ इतिहास
पाठीवर घेऊन फिरणारी
स्त्री...
संस्कृतीच्या कुठल्याच पानावर
सापडत नाही मला माझा चेहरा....
त्यांनी माझ्ऱ्या भूकेलाच
माझं सर्वस्व मानलं
नि माझ्ऱ्या नग्न देहाला
संभ्रम मोहमाया"

(जनानखान्याच्या तळाला पृ ४७)

अगतिक झालेल्या अशा स्त्रीला शेवटी समाज वेश्या बनवतो. तिच्या विराट वेदनेच्या काळयाभोर सावलीला म्हणजेच तिच्या अपत्याला जनानखान्याच्या तळाला डांबून ठेवण्यात येतं.

स्त्रीदु:खाची कितीतरी रुप प्रज्ञा लोखंडे यांनी आपल्या काव्यातून प्रकट केली आहेत. स्त्रीच्या अनेक पदरी वेदना त्यांना अस्वस्थ करुन सोडतात. त्यामुळेच प्रज्ञा लोखंडे स्त्रीच्या प्रत्येक वेदनांची दु:ख सूक्ष्मतेने पण नेमकेपणानं मांडतात. त्यांची कविता फक्त स्त्री दु:खाचे वर्णन करण्यापूरतीच मर्यादित रहात नाही तर स्त्रीच्या सर्वांगीण उध्दाराचा मार्गही त्यांनी आपल्या कवितेतून दाखवला आहे. या कवयित्रींच्या कवितेत रुपकात्मकता आधिक्याने येते. प्रतीके येतात. कवितेचे रुप सरळ, साधे पारदर्शी नाही. त्यास अनेक पैलू आढळतात. त्यामुळे ती आशयघन होऊन जाते.

*तृष्णा संपूर्ण दु:खाचं मूळ आहे :

सिध्दार्थ गौतम बुध्दाच्या तृष्णेचं तत्वज्ञान सर्वदूर पसरलेलं आहे. याची जाणीव कवयित्री प्रज्ञा लोखंडे यांनाही होते की या तृष्णेमध्येच अनादी दु:खाचं मूळ लपलेलं आहे. तृष्णेचा मानवी जीवन व्यवहारांशी काय संबंध आहे? याचा शोध कवयित्री बुध्दाच्या तत्वज्ञानातून घेताना दिसते. अशा शोधातून काही मूलभूत प्रश्न कवयित्रीच्या समोर येतात की तृष्णा जेव्हा स्त्रीत्वाच्या आदिरुपाला साद घालत तेव्हा तृष्णेचे रुप कोणते असते? तृष्णा जेव्हा घनघोर एकांतात डोळयातले भाव पुसून टाकते तेव्हा तृष्णा कोणत्या रुपात असते? स्त्रीच्या पूर्णत्वाच्या प्रौढ पिढीला तृष्णा जेव्हा बिलगते तेव्हा तृष्णेनं कोणते अभिरुप धारण केलेलं असतं? असे प्रश्न कवयित्री प्रज्ञा लोखंडे यांच्या प्रतिभेला आवाहन करत असतात

"तृष्णा स्त्रीच्या दु:खाचं मूळ आहे
तृष्णा कवयित्रीच्या दु:खाचं मूळ आहे
तृष्णा आहे माझ्या व्याकुळतेचं धारदार पातं
तृष्णा आहे माझ्या सकळ इंद्रियांचा दुखरा नाद
तृष्णा आहे माझ्या अंत:स्थांच्या आरपार"

(तृष्णा पृ ४४)

सिध्दार्थ बुध्द म्हणतो तृष्णा दु:खाचं मूळ आहे!

कवयित्री म्हणते की असा हा तृष्णेचा कठोर खेळ कवयित्रीच्या पदरात दु:खाची फुलच घेऊन येतो. दु:खाची फुलं कोणत्याही रुपात आली तरी कवयित्री त्यांच्या मूळांना कवटाळतेच. कवयित्रीला बुध्दाच्या कटोऱ्यातील क्षुधा व्हायला आवडते. ही युगानुयुगाची तृष्णेची बाधा कवयित्रीला अवघी व्यापून राहते. तिच्या अस्तित्वात मिसळून जाते. अशी अनादी तृष्णा महानिर्वाणानंतरही मरत नाही. असे कवयित्रीने व्यक्त केलेले तत्वज्ञान अधिक चिंतनप्रवण बनते.

बुध्दाने सिध्द केलेल्या तृष्णेप्रमाणेच संस्कृती ही सुध्दा मानवी जीवनात पिढयान्‌पिढयांची माता बनलेली आहे. इथली संस्कृती प्रज्ञा लोखंडे यांच्या काव्याचा विषय ठरली आहे. संस्कृतीच्या व्यक्तीमत्वाचे विश्लेषण त्यांनी केले आहे. या कवितेतील विद्रोही आशय हा अधिक व्यापक पातळीवरचा आहे.

"ही संस्कृती आहे
माझी पिढयान्‌पिढयांची माता
तिच्या गर्भाशयात ती मला वाढवते

तडफडत्या मांडयांतून रक्ताळून मला जन्म देते.
जन्मताच माझ्या गळयाला ती नख लावत नाही.
मायेनं माझं भरण–पोषण करते
संस्कृतिमाता माझ्यावर अंगाई ते अंताईपर्यंत
सुफळ संपूर्ण संस्कार करते."

(संस्कृती पृ. ६२)

संस्कृतीच्या एकंदरीत मायावी रुपाला कवयित्री उजाळा देते. अंगाई ते अंताईपर्यंत संपूर्ण संस्कार करणारी संस्कृती माता मायेनं भरण–पोषण करते. जन्मतःच ती गळयाला नख लावत नाही. संस्कृती ही निरंकुश सत्ता आपलं अपरंपार जडशीळ स्वत्व टिकऊन आहे. जाता प्रसवणारं तिचं प्रवेशद्वार वेगवेगळया पध्दतीनं क्रियाशील आहे. कवयित्री संस्कृतीची लाडकी लेक होऊ पाहते त्याच वेळी एक अपेक्षा करते आहे की संस्कृतीच्या सर्वंकष रितेपणापासून मुक्ती मागत आहे. जगण्यासाठी नेणिवतेला उत्कट अंधार मागत आहे. संपूर्ण दुःखाची पाळमुळं कवयित्री पाहू इच्छिते. कवयित्रीने संस्कृतीला केलेल्या आवाहनाचं तात्विक रुप विलक्षण आकलनीय वाटते.

अशाप्रकारे कवयित्री प्रज्ञा लोखंडे यांनी आपल्या कवितेतून स्त्रीजीवन, स्त्रीदुःखवेदना स्पष्ट करतानाच जीवनातील अपार तृष्णा–करुणा यांचे विलक्षण भाष्य स्पष्ट केले आहे.

## निष्कर्ष :

१. प्रज्ञा लोखंडे यांनी प्रामुख्याने स्त्रीवादी भूमिका आपल्या काव्यातून मांडताना स्त्री-प्रश्नांचे चित्रण वास्तवदर्शी झाले आहे.

२. त्यांच्या कवितेचा रुपबंधात्मक कल मुळात स्त्री वेदनेशी निगडीत आहे. प्रज्ञा लोखंडे यांनी आपल्या कवितेतून स्त्री मनाचा, संवेदनांचा अत्यंत सखोलपणे चिंतनशील विचार केला आहे.

३. इथल्या स्त्रीचं दु:खद जीवन हाच प्रज्ञा लोखंडे यांच्या विचारप्रक्रियेचा मुख्य स्त्रोत आहे. अशा दु:खित स्त्रीला स्वतःच्या उद्धाराचा मार्ग कवयित्रीने आपल्या कवितेतून दाखवला आहे.

४. तृष्णा दु:खाचं मूळ आहे. असं म्हणतं तृष्णेचा संपूर्ण मानवी व्यवहारांशी असाणारा सहसंबंध प्रज्ञा लोखंडे यांनी प्रकट केला आहे.

५. सिध्दार्थ बुध्दांची विचारधारा प्रज्ञा लोखंडे यांच्या कवितेतून सुस्पष्ट होऊन स्त्रवते.

## ब) स्त्री पुरुष संबंधातील रितेपणा व फोलपणा सांगणारी कविता:

१९७५ नंतरच्या स्त्रीमुक्ती चळवळीनंतर स्त्रीवादी विचारांची, भावनांची प्रचंड लाटच जगभर निर्माण झाली. मराठी काव्य वाङ्मयात स्वातंत्रोत्तर काळातील पहिल्या पिढीतील कवयित्रींनी जे रंजनवादी काव्य लिहिलं त्यात प्रामुख्याने प्रेम, पुरुषपूजा, आत्मविलय, त्याग, समर्पित वृत्ती, सहवासाची सुखात्मिक वर्णने याच गोष्टी अधिक प्रमाणात दिसून येतात. विरहानं व्यथित होणं आणि सहवासात फुलून येणं हेच या प्रेमकवितांचं स्वरुप होतं. खरे तर संस्कृतीतून संस्कारित झालेला मुखवटाच असतो. परंतु स्त्रीवादी चळवळीनंतर स्त्रियांना आत्मभान येऊन नवीनच जाणीव जागृती त्यांच्या ठायी निर्माण झाली. साहजिकच हा बदल १९८० नंतरच्या आधुनिक कवयित्रींच्या काव्यात दिसून येतो. याविषयी अभिप्राय देताना जेष्ठ समीक्षक रा.ग. जाधव म्हणतात, "जीवनमूल्यांची स्त्रीची व स्त्रीत्वाची, प्रापंचिक भूमिकेची, व्यक्तिगत मूल्यमापनाची जुनी संदर्भ चौकट १९८० नंतरच्या कवयित्रींनी मोडून टाकली आहे."[3] स्त्री विषयी आधुनिक व पुरोगामी भूमिका घेऊन आधुनिक कवयित्रींनी काव्यलेखन केलं आहे. या कवयित्रींनी पुरुषांच्या संदर्भात स्त्रीच्या वाटयाला येणारे, नातेसंबंधांमधील विसंवाद, असुरक्षितता , भयग्रस्तता, व्यक्तिमत्वाचा लोप, एकाकीपणा आणि थिजलेपण आपल्या लेखनातून प्रखरतेनं व्यक्त केले आहे.

पुरुषसत्ताक पोलादी चौकटीमध्ये जीवाच्या आकांताने फडफडणारी स्त्री, तिचे जीवन प्रज्ञा लोखंडे यांना अस्वस्थ करुन सोडते. स्त्रीच्या अस्तित्वाशी तिच्या स्वत्वाची लढाई सुरु झाल्यावर तिची घुसमट वाढते. शोष अधिकच वाढून जिवाचा थरकाप होतो. अशावेळी छिन्नविछिन्न नेणिव तिला जगू देत नाही. प्रेमातली, नात्यातली विफलता, विवशता कवयित्री मार्मिकपणे मांडते. तिने अशा फोल नातेसंबंधाकडे म्हणजेच घनदाट जंगलाकडे पाठ फिरवली आहे. आता पुन्हा परत फिरायचं नाही असा निश्चय करुन ती त्याला म्हणते

" हाडामांसावर साचलेल्या दाट थरातून
लवलवत येणाऱ्या आदिम सुरांना छेडू नकोस
ज्याला फक्त सुरुवात आहे
असं काही रुजवू नकोस."

(मी पाठ फिरवली घनदाट जंगलाकडे)

गुलामीचा किंवा दु:खवेदनेचा 'अनंत' पणा कवयित्री ठामपणे नाकारते. कवयित्री म्हणते प्रेमामध्ये एकमेकांसाठी जगणं अनावर आणि सर्वभर होतं पण नातं तुटून

गेल्यावर याच आठवणी जून आणि पाशवी वाटू लागतात. आणि आणखी किती काळ आपण अचेतन वर्तमानाचं ओझ वागवायचं? असा प्रश्न कवयित्रीला पडतो. त्यापेक्षा कवयित्री म्हणते की

" दे सोडून वाऱ्यांवर
संबंधांची असंबध्द पान
घे नवा मोकळा श्वास
आकारु दे निराकराला
मिसळू दे आपल्या जगण्याला
एकमेकांच्या जगण्याला."

(ये अश पारदर्शी वळणवर पृ. ३१)

कवयित्री म्हणते की तू आता जीर्ण पुरातन अवशेषांमधून बाहेर ये. ज्या नात्याला आता अर्थ राहिला नाही असं नातं जपायचंच कशाला? तू अशा पारदर्शी वळणावर ये की जिथं आपण प्रेमाला प्रेमच म्हणू आणि व्यभिचाराला .... व्यभिचार. ही नित्यनूतन दु:खाची व्याकूळता तशीच राहू दे असे कवयित्री म्हणते.

क्षणाक्षणाने संपत जाणाऱ्या नात्याची जाणीव कवयित्री प्रज्ञा लोखंडे यांना अस्वस्थ करुन सोडते. नातेसंबंधातील निर्माण झालेला विसंवाद त्यातून पुढे एकाकीपणा भोगावे लागते. आणि अखेरीस थिजलेली अवस्था प्राप्त होते. असे आशयसूत्र प्रज्ञा लोखंडे यांनी आपल्या काव्यातून व्यक्त केले आहे. संबंध संपत जाण्याविषयी कवयित्री म्हणते की मी प्रत्येक वेळी तुला साथ दिली आहे. तुझ्या पडझडीच्या दिवसात साकळत जाणाऱ्या अंधाराला मी कायम सामोरी गेली आहे. तुझ्या भग्न हातांसाठी, अंधारलेल्या डोळयांसाठी आणि उजाड एकाकीपणाच्या हिंस्त्र पावसात मी अंतर्बाहय तुझ्या बरोबर राहिले. परंतु हे सारं क्षणाक्षणानं संपतच गेलं. आपलं नातंच हळूहळू गळून पडलं. तरीही तुला दोष न देता मी माझ्या दु:खांनाच कुरवाळत बसते. कारण मला आशा आहे की,

"पुन्हा जुळेल
आभाळगाणं तुझ्या मनात
पुन्हा ढगांवरुन अलगद चालता येईल
झोका उंच उंच जाईल...
डोळे भरुप पाहू सूर्याचे रंग
वस्तीला येतील हरवलेले संदर्भ

रिकाम्या भिंतीवर शहारा उमटेल
पुन्हा रक्ताला पालवी फुटेल...'

(पुन्हा रक्ताला पृ ३३)

असा अगम्य आशावाद प्रज्ञा लोखंडे आपल्या कवितेतून मांडतात स्त्री-पुरुष संबंधातील विसंवाद, अंतर वैफल्य, औदासिन्य इत्यादी नकारात्मक जाणिवांचा उद्‌भव प्रथमतः मानसिकतेत होतो असे कवयित्रीला वाटते. एकदा बिघडलेल्या नातेसंबंधानंतर एकमेकांशिवायच्या जगण्याच्या हर एक संदर्भांना अटळपणे सामोरं जावंच लागतं. जगण्याला जगणचं पर्याय मानावं लागतं कवयित्री म्हणते

"केंद्र आणि परीघाच्या
सुबक परंपरेत
अर्थहीन होत जातं
जिवापाड जपलेलं नातं
हळूहळू संपत जातं नात्यातलं चैतन्य
हळूहळू संपत जाते आतली धुगधुगी
उरतो फक्त सांगाडा
प्राणांसहित कातडीला वेढून असणारा"

(केंद्र आणि परीघ पृ. ३४)

कवयित्री म्हणते की नातं फोल ठरल्यावर एकटेपणाच्या तप्त लाव्हात तू स्वतःकडून तडफडत राहतोस. आणि मी ही वर्तमानामध्ये स्वतःला सामाऊन घेते. कारण एकमेकांचं असं काहीच राहिलं नाही तेव्हा अस्तित्वाच्या पलीकडे असलेला आठवणींचा तुबुंब डोह पुन्हा पुन्हा हि नकळत राहतो. कवयित्री प्रज्ञा लोखंडे यांनी असे जीवापाड जपलेले नाते जीवानिशी तुटून गेल्यावर निर्माण झालेल्या पोकळीचे वर्णन केले आहे.

रितेपणात या कवितेतून प्रज्ञा लोखंडे यांनी जीवनात निर्माण झालेल्या उदास पोकळीचे वर्णन केले आहे. नातं संपल्यावर किंवा संपल्यावर जर एकमेकांशी संवाद साधण्याचा प्रयत्न केला तर त्या संवादात निःशब्द भकासपणाच भरुन राहतो. प्रज्ञा लोखंडे म्हणतात की अशावेळी अक्षर शब्द भाषा हे सर्व काही हरपून जातं भाषाहीन निर्वात पोकळीत एक निर्जीवपणा येतो त्या दोघाच्या संवादाला कवयित्री म्हणते

"तू ऐकवतोस
अनावर कोसळणाऱ्या
पावसाच्या आर्त हाका
तू एकवतोस काळजातला
उदास गलबला..........
..............मी ऐकवते
तुझ्यामाझ्यातून वाहणारं
निरभ्र जगणं
मी एकवते तुझ्यामाझ्यातून वाहणारं
शांत आकान्ताचं मरणं "

(रितेपणात पृ. ३६)

ही कविता स्त्री दास्याची दुःखाची, वेदनेची कैफियत आहे. पण ती नैराश्येचे हताशतेचे–पराजीत कलेवर नाही. कैफियतीच्या अखेर क्रांतीची ज्योत आहे. बंडाचे निशाण आहे. नकाराचे प्रखर अधिष्ठान आहे असे दिसून येते.

ही कविता दुःखाची फक्त कैफियत मांडत नाही तर कवयित्री म्हणते. डोळस आत्मशोधही घेते. स्वतःला तपासत चिकित्सकपणे स्वतःला कवितेतून मुद्रित करते. तो आत्मशोध प्रभावी वाटतो.

"आपल्याला व्हायचं नसतं
प्रेषित एकमेकांसाठी
करायचं नसतं
स्वतःला स्वतःमध्ये बंद एकमेकांसाठी
व्हायचं नसतं
भिंतींच्या अजस्त्र विरुप सावल्या एकमेकांसाठी"

(एकमेकांमधून पृ. ४०)

म्हणूनच कवयित्री म्हणते की अशा नात्याचा मृत्यू आपण स्वीकारतो. आणि आयुष्याभर जाळत ठेवणाऱ्या यातना अखंड भोगत राहतो. नातं संपल्यानंतर मनाच्या विकल अवस्थेचे प्रज्ञा लोखंडे यांनी या ठिकाणी वर्णन केले आहे.

वैफल्यग्रस्त अवस्थेतून पुन्हा पुन्हा त्याने हाक देऊन पाहिली तरी त्याला साद देण्याची तिची इच्छाच नाही असे कवयित्री म्हणतात. त्यांच्यातला दुरावा

आता अटळ आहे आणि तो मैलोन मैल पसरतो आहे. तो पार करुन तिला परतून त्याच्याजवळ येणं शक्यच नाही. कारण त्याने तिच्या जगण्यावर प्रहार करुन मर्यादित कक्षेत ठेऊ पाहिलं. हे ती सहन करु शकत नाही. म्हणूनच असं नातं संपलं ना! आता फक्त तीवाट पहात आहे. त्या दोघांमधले संदर्भ निःसंदर्भ होण्यासाठी.

प्रज्ञा लोखंडे यांच्या कवितेतून त्याचे आणि तिचे फुलून येणारे नाते त्यातून बहणारे जीवन याचे दर्शन होत नाही. कारण वर्षानुवर्षे आपल्या संस्कृतीने स्त्रीला बहाल केलेल्या दुय्यमत्वाने स्त्रीचे मुक्त जगणे हिराऊन घेतले आहे. आता बंधमुक्त होऊ पाहणारी स्त्री आधुनिक काळात दिसत असली तरी कौटुंबिकतेमध्ये हे मान्य केले जात नाही. आणि इथंच स्त्रीचा खऱ्या अर्थानं स्वत्व संघर्ष सुरु होतो. पुरुषी मनोवृत्तीस न पटणाऱ्या या संघर्षामुळेच त्या दोघांचे सहजीवनाचे, संसाराचे नाते संपुष्टात येते. अशा संपत जाणाऱ्या नात्याचा रितेपणा आणि फोलपणा हा प्रज्ञा लोखंडे यांच्या कवितेचे मर्मस्थान बनते. त्यांच्या अशा कवितेतील नायिका ही संपत जाणाऱ्या नात्यात पुन्हा परतून जीवन जगण्याचा प्रयत्न करताना दिसत नाही. आणि हेच या कवितेचं यश आहे. प्रज्ञा लोखंडे म्हणतात.

" ती भुकेली आहे कित्येक शतकापांसून
तिची भूक असीम, अपरंपार
देहामनाची आभा मागणारी"

(ती भुकेली आहे... पृ. ७६)

त्यामुळेच लादलेले, नको असलेले नाते संपवत असलेली स्त्री त्यांच्या कवितेतून दिसते. असं करताना वैयक्तिक तिलाही दुःख भोगावं लागतच दृ कारण तिला कुटंबाबरोबरच सामाजिक संघर्षाचा लढा दयावा लागतो. अशा मनस्वी संघर्षाचा लढा प्रज्ञा लोखंडे यांच्या काव्यातून उभारला गेला आहे. म्हणूनच कवयित्री म्हणते.

"पुन्हा पुन्हा रुजवते ती मनस्वी यातनांचा तुकडा
गाते आदिम प्रसवाची अंगाई
नि तिचं प्रदीर्घ रितेपण
उचंबळतं
शतकाच्या दखलपात्र वर्तमानावर"

(ती भुकेली आहे पृ. ७६,७७)

स्त्री-पुरुषाच्या भग्न नात्याचे प्रतिनिधित्व ही कविता करते.

## निष्कर्ष :

१. प्रेम, पुरुषपूजा, त्याग, समर्पण, सहवासाची सुखात्मिक वर्णने अशी पहिल्या पिढीतील कवयित्रींच्या कवितेची जूनी संदर्भ चौकट १९८० नंतरच्या कवयित्रींनी मोडून टाकली.

२. प्रज्ञा लोखंडे यांनी नातेसंबंधांतील विसंवाद भयग्रस्तता, व्यक्तिमत्वाचा लोप, एकाकीपणा आणि त्यातून येणारे शिजलेपण आपल्या लेखनातून प्रखरतेने व्यक्त केले आहे.

३. स्त्री-पुरुष नातेसंबंधातील रितेपणा व फोलपणा सांगणारी अशी प्रज्ञा लोखंडे यांची कविता आहे.

४. स्त्री पुरुष नातेसंबंध संपवत असताना स्त्रीला कौटुंबिक आणि सामाजिक संघर्ष करावा लागतो. प्रज्ञा लोखंडे यांच्या कवितेतून असा संघर्ष लढा उभा केला गेला आहे.

५. माणूसपणाच्या परिमाणाने जेव्हा स्त्री-पुरुष नाते तापसले जाते तेव्हा या कवियित्रीच्या हाती स्त्रीचे दारुण, दुय्यमत्व , अन्याय, वेदनांच अधिक येतात. या कवितेची ती प्रेरणा केद्रवर्ती होते.

## क) दलित जाणिवेतून स्त्रीवाद व्यक्त करणारी कविता :

१९६० नंतरच्या मराठी कवितेमध्ये दलित कवितेचे योगदान मोलाचे समजले जाते. गावकुसाबाहेरच्या दुर्लक्षित, उपेक्षित, शोषित अभावग्रस्त अशा समाजघटकांच्या भावना आणि अनुभवांना दलित कवींनी आपल्या कवितांमधून साकार केले. दलित कवींनी आपल्या कवितेतून फक्त उपेक्षितांचे जगणेच व्यक्त केले नाही तर ही कविता अशा अभावग्रस्तांच्या मुक्तीसाठी देखील आग्रह धरीत होती. दलित कवींनी आशयपूर्ण वैशिष्टयांबरोबरच आपल्या वेदनांना, भावनांना काव्यरुप देण्यासाठी अनोख्या शब्दकळेचे आणि औचित्यपूर्ण प्रतिमासृष्टिची निर्मिती केली. उपेक्षितांचे भावानुभाव प्रत्ययेकारक रीत्या, उत्कटतेने प्रकट करणाऱ्या कविता दलित कवींनी लिहिल्या. दलित कवयित्रींनी मात्र दलित कवींच्या दुसऱ्या पिढीपासून आपल्या काव्यलेखनाला सुरुवात केली. या कवयित्रींच्या कवितांचे स्वरुप हे प्रमुख दलित कवींच्या काव्यरचनांशी साधर्म्य दाखवणारेच होते. परंतु कवितेमधून स्वतःचे असे खास अनुभवविश्व प्रकट करताना त्याद्वारे काव्यांतर्गत आत्मनिष्ठेचा प्रयत्न देऊन स्वतःचे असे अखंडित काव्यात्मक व्यक्तिमत्व साकारणाऱ्या अशा प्रज्ञा लोखंडे या कवयित्री आहेत.

त्यांच्या कवितेवर फक्त दलित कविता अशी छाप पडत नाही कारण त्या कवितांधील भावानुभवांच्या केंद्रस्थानी एक संवेदनशील स्त्रीमन ही आहे. सभोवतालच्या विपरीत समजावास्तवाचा, वर्ग वर्णभेदांमुळे निर्माण झालेल्या दलित समाजाचा तसेच जीवनाच्या मूलभूत मानवी गरजा भागवण्यासाठी रानोमाळ भटकणाऱ्या अशा विविध समाजघटकांचा आणि पाठोपाठ येणाऱ्या ताणतणावांचा, अंतर्विरोधांचा अत्यंत सापेक्ष अन्वय प्रज्ञा लोखंडे यांनी आपल्या काव्यातून लावलेला दिसून येतो. प्रस्थापित व्यवस्थेविरुध्द पुकारलेला विद्रोह आणि तत्सम समाजाकडून मिळालेल्या माणुसकीचा नकार हेच प्रमुख वैशिष्टय या काव्यामागे आहे. गीता साने याविषयी म्हणतात, "कोणाताही मानव मुक्तीचा लढा-मग तो दलितांचा असो वा स्त्रियांचा असो तो वेदनेने भरलेला असतो."[४]

अनेक वर्षांचा हिशोब करताना कवयित्री प्रज्ञा लोखंडे यांचे मन भुतकाळात जाते. मग कवयित्रीला गावकुसाबाहेरची खुळखुळयाची काठी आठवते, येरकरकीची पाटी आठवते. चाऱ्या, डल्ल्या, गुडसा, ढोलकं, कांडं, संबळ, सरवा, मोळया, विळी, कोयता असा संपूर्ण मातीतला लसलसता भूतकाळ डोळयासमोर उभा राहतो. कवयित्री म्हणते की हे सर्वच किती छान आहे असं स्वतःला समजावतानाच

ताणलेल्या बाणागत सणाण्त अनेक वर्षे निघून गेली. अशा भावावस्थेत व्यक्ती समष्टीच्या तत्वज्ञानाचं क्रूर जाळं भोवताली गच्च आवळतच गेलं. अशातूनच गुलाम झालेल्या शरीरासाठी कवयित्रीने एका नव्या जन्माचा हव्यास प्रकट केला आहे.

" यच्चयावत अभावातून वरवर सरकणारा जिना अस्तित्वाचा
गच्च वस्तूंनी मध्यमवर्गीय गरजांनी लदबदलेलं घर
समष्टीचं क्रूर जाळं आत-बाहेर
नवरा मुलगा प्रियतम
जिवलग सोयरे सकळ
सुरक्षिततेची बेहद्द नशीली झिंग
मेंदूतल्या शुभ्र वळयांना झुगारणऱ्या
गुलाम शरीराला हवाय
नवा कोरा अस्खलित जन्म"

(नवा कोरा अस्खलित जन्म पृ. १)

वर्षानुवर्षाच्या गुलाम मानवाला हव्या असलेल्या नव्या कोऱ्या अस्खलित जन्माचा शोध प्रज्ञा लोखंडे यांची कविता घेते.

मुखवटयांच्या जगात जेव्हा गुदमरायला होतं आणि सोंगाढोंगांच्या हवा बेदलीत समाजाचा कंटाळा येतो तेव्हा कविताच मदतीचा हाते देते. असं प्रज्ञा लोखंडे म्हणतात. दलित समाजाचे त्यातील व्यक्तींमनाचे चित्रण करताना त्या म्हणतात

" काळोखले मन । जिण्याचे सरण
रिते रितेपण । वस्तीतून
संसाराच्या चिंध्या । वाऱ्यावर गेल्या
मागे हाका मुक्या । कोंडलेल्या
धर्माची ही नखे । गळा रुतलेली
वात करपली । डोळयांचीच"

(काळोखले मन पृ १८)

भूक, उपासमार आणि उपेक्षा यांचे शस्त्र खुपसले गेल्याने मनात गलबलेचा हंबर फोडला जातो. त्यामुळे रक्तात विखार येऊन घरात काहूर माजते. परंतु ह्या

विखाराने त्यांची चूल पेटत नाही हीच शोकांतिका आहे. शेवटी काळजात दु:खाचे सल जपतानाचा आकांत सैरभैर होतो असे कवयित्री म्हणते.

प्रज्ञा लोखंडे यांना उजेडाशी अनुबंध असणाऱ्या प्रवृत्ती विषयी अपार आस्था आहे. हया प्रवृत्तीचे काही प्रश्न सुटतात तर काही नव्याने उभे राहतात. अशा प्रवृत्तीचा उजेडाशी मनमोकळा संवाद चालू असतो. पण त्यावेळी जर स्वत:चाच आवाज अनोळखी वाटला तर अशा उजेडाविषयी त्यांना शंका येऊ लागते.

"तसं फार काही त्यांनी मागितलं नव्हतं
फक्त थोडीशी हिरवळ
मिणमिणत्या उजाड देहाने
आकाशाच्या विराट पोकळीतून
गळणाऱ्या अंधारात
अखेर ते हेलकावत राहिले.
हवा, पाणी, भाकरी आणि जमिनीच्या चकव्यात
अवघ्या आयुष्याला ओलिस ठेऊ लागले.
उजेडात तळपणारे त्यांचे चेहरे
कसे इतके विद्रूप झाले?"

(उजेडात पृ. १९)

हवा, पाणी, भाकरी या जीवनाच्या मूलभूत गरजांसाठी जेव्हा आयुष्याच गहाण ठेवावे लागते तेव्हा त्यांच्या जीवाने केलेला मूक आक्रोश समजण्या पलीकडचा असतो. त्यामुळेच असा उपेक्षित समाज शेवटी कधीच न संपणारी आणि रक्तकण टिपून घेणारी पाशवी वाट चालू लागतो. असे कवयित्री प्रज्ञा लोखंडे म्हणतात.

वर्षानुवर्षे मुक्तीची वाट या दलित समाजाने पाहिली. जरी तसे प्रयत्न केले गेले तरी त्यांच्या मुक्तीची मनस्वी आर्त गाणी वाऱ्यावर विरुनच जातील असे कवयित्री म्हणते. स्वातंत्र्यासाठी प्रयत्न करताना स्वातंत्र्यमिळणे तर दूरच पण अशा मदग्रस्त सत्तेची हिंस्त्र नखं घुसतील आरपार आणि जगणंच छिन्नविछिन्न करुन टाकतील. कवयित्री म्हणते

"घुसमटतील लाटा

रुततील नखं मदमस्त सत्तेची

तडफडत आक्रंदत घुमत राहील

शाश्वत गाज स्वातंत्र्याची"

(शाश्वत , पृ. २०)

'दिंडी' या कवितेतून प्रज्ञा लोखंडे यांनी एकविसाव्या शतकातही विषमजात व्यवस्था कशी तग धरुन आहे हे स्पष्ट केले. या कवितेतून विठ्ठलाला उद्देशून कवयित्री म्हणते की झाडाची पाने हालतात, त्यांना थांबवता येत नाही. सटवाईने कोरलेले नशीब बदलता येत नाही कारण या सर्वांचा विठ्ठला तूच कर्ता करविता आहेस. अठ्ठावीस युगे तू विटेवर उभा असतानाही चोख्या महाराला जोहारापलीकडे जात येत नाही. तत्कालीन विषम समाजव्यवस्थेत आणि आजही त्यात विशेष फरक पडला आहे असं नाही. कवयित्री म्हणते की याविरुध्द बंड केलं तरी त्याचा उलटाच परिणाम होतो.

"काल-परवा आक्रितच घडलं,

तुझ्या सटवाईला तिने ठोकरुन लावलं...

बघता बघता ती क्षितीज तोलू लागली

पसा भरभरुन उजेड पदरात घेऊन आली.

एकाएकी काय झालं

'त्यांनी' तिचे डोळे खुडले

तिच्या स्पर्शाच्या विटाळाचे ओघळ

रकान्यात ओघळले."

(दिंडी पृ.२१)

वरिष्ठ वर्गाकडून कनिष्ठ वर्गावर अत्याचार होत असतात त्या वर्गातील दुबळया घटकावर हल्ला केला जातो. एका समाजाला अद्दल घडवण्यासाठी तत्सम समाजातील स्त्रीला विद्रुप करण्यात येतं आत्मभान जागी झाल्याची शिक्षा तिला करण्यात येते. ती स्त्री आहे म्हणून आणि दलित आहे म्हणून अशा दुहेरी स्वरुपात ती अत्याचाराला बळी पडते असे प्रज्ञा लोखंडे म्हणतात. आणि अशा गोष्टींना संभावित दंतकथा समजून सारा समाज दुर्लक्ष करतो. अशी तीव्र संवेदना प्रज्ञा लोखंडे यांनी व्यक्त केली आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या दलित वर्गाला 'शिका, संघटित व्हा, आणि संघर्ष करा 'असा मोलाचा संदेश दिला आहे. या संदेशाचे अनुग्रहण करण्यासाठी सरसावलेल्या दलितांच्या चिमुरडया पोरांना शिकताना नेहमी दबावाखालीच रहावे लागते. पांढरपेशा समाज प्रस्थापित नियामांची काठी उगारुन दहशत पसरवण्याचे काम करतो. त्यामुळे चिमुकला दु:खी जीव एकाकी होत जातो. कवयित्री म्हणते की, शाळेत जाणारा मुलगा आशाआकांक्षांचे दफ्तर वागवताना एखादया तत्ववेत्त्यासारखं बोलतो. अभावांच्या बागडणाऱ्या फुलपाखरामागे तो धावतो. ध्येय, संस्कार, करिअर अशा शब्दांच्या ढिगाऱ्याखाली दबून जातो.

"पिसं झडून गेलेल्या

घायाळ पाखराला खाणाऱ्या

कावळयांचचं चित्र तो पुन्हा पुन्हा काढतो."

(चेहरा, पृ. २३)

अशा पध्दतीने प्रस्थापित उच्चवर्णिय समाजाला कवयित्रींनं दुष्ट कावळयांचे प्रतिक मानले आहे.

म्हणूनच कवयित्री म्हणते की जिथं जनावरांना न्याय मिळतं नाही तिथं माणसांचं काय? भरुन आलेल्या आभाळात डोकं झाकायला मला चार वितीची जागा सुध्दा नाही. असं या उपेक्षितांचे दु:खमय जीवन आहे. काटयाकुटयांची वाट तुडवत मुलाबाळांची घालमेल कुठंवर सोसायची? असा प्रश्न कवयित्रीला पडतो.

"अंधारात भेगाळलं

भाकरीचं सपान

कुणी दिला हयो भोग

काचतोया गळा भर

माज्या जिण्याचं सरण

धडाधडा पेटलंय"

(सरण , पृ.२७)

अशा अनेक गहन प्रश्नांची उत्तरं शोधण्याचा प्रयत्न प्रज्ञा लोखंडे यांनी आपल्या कवितेच्या माध्यमातून केला आहे. कवयित्री आपली पिढयापिढयांची माता असणाऱ्या संस्कृतीलाही दोष देत आहे. कवयित्री म्हणते की

"तू आहेस निरंकुश सत्ता

तू आहेस जात प्रसवणारं प्रवेशद्वार"

(संस्कृती पृ. ६३)

कवयित्रीने या कवितेतील 'मी' चे स्वरुप स्त्रीवाचक ठेवले आहे. स्त्री ही मूळातच अधिक संवेदनशील असते. आणि तथाकथित संस्कृतीच्या अन्यायाचा जाच स्त्रीनेच अधिक भोगला आहे. पुन्हा जातीव्यवस्थेला कारणीभूत असणारी संस्कृती स्त्रीच्या दु:खमय जीवनाचे प्रतीक बनते. म्हणूनच कवयित्री म्हणते-

"पाहू दे मला दु:खाची पाळंमुळं

इत्थंभूत पसरणारी"

(संस्कृती पृ. ६४)

असा शोषित समाजाच्या वेदनेचा शोध कवयित्री संस्कृतीच्या माध्यमातून घेऊ पाहते.

कवयित्री प्रज्ञा लोखंडे यांचे सामाजिक भान लक्षणीय वाटते. त्यांनी यथाशक्ती समाजाचे समग्रचित्रण उभे केले आहे. परंतु असे करताना त्यांची कविता प्रस्थापित बंड पुकारते पण उर बडवेपणा किंवा आक्रस्तळी शब्दबंबाळपणा करत नाही. हेच प्रज्ञा लोखंडे यांच्या कवितेचे वैशिष्टय आहे. त्यांच्या कवितेत त्यांच्या आत्मभावाबरोबर समजाभान मुखर होताना आढळते.

## निष्कर्ष :

१. प्रस्थापित व्यवस्थेविरुध्द पुकारलेला विद्रोह आणि मराठी वाङ्मयीन परंपरांनी दिलेला अर्थपूर्ण नकार ही दलित कवींच्या काव्यलेखनामागील प्रमुख सुत्रे होती.

२. मात्र प्रज्ञा लोखंडे यांनी आपल्या काव्यामधून खास स्वतःचे असे अनुभव विश्व कोरले आहे.

३. त्यांच्या काव्यांतर्गत आत्मनिष्ठेचा प्रत्यय त्यांच्या अखंडित काव्यात्म व्यक्तिमत्वाला साकार करतो.

४. गावकुसाबाहेरचे दुर्लक्षित जग, शोषित, अभावग्रस्त समाजघटकांच्या भावानुभवांना प्रज्ञा लोखंडे यांनी आपल्या कवितेतून प्रकट केले असले तरी त्यातूनही स्त्रीवादी भूमिकेचा प्रत्यय त्यांनी साक्षात केला आहे.

## ड) महानगराचे विदारक जीवनदर्शन घडवणारी कविता :

मानवाचा क्रमाक्रमाने उत्कर्ष घडऊन आणणारा घटक म्हणजे संस्कृती, संस्कृती संबंधीचे अनुभव आणि अर्थपूर्णता पिढयान्‌पिढया बदलत जातात. आधुनिक काळात निर्माण झालेले महानगर हे सुध्दा मनुष्यसंस्कृतीचेच एक प्रतीक आहे. समाजात एकाचवेळी जुन्या परंपरा आणि आधुनिकता एकत्र जगताना हे दोन्ही संदर्भ दिसतात. महानगर हे सामाजिक सांस्कृतिक पर्यावरण आहे. साहजिकच मराठी कवितेतही हे महानगरीय जीवनदर्शन आले आहे. दिलीप चित्रे, अरुण कोलटकर, नामदेव ढसाळ, नारायण सुर्वे या जेष्ठ कवींप्रमाणेच मलिका अमरशेख, नीरजा, रजनी परुळेकर , सुनंदा भोसेकर, मीना प्रभु, अरुणा ढेरे यांच्या काव्यामध्येही महानगरीय संवेदन आलेले आहे. रा.ग. जाधव म्हणतात, "ऐंशी च्या दशकातील कवयित्रींनी केवळ कवितेचा विषय म्हणूनच कमी अधिक प्रभावही त्यांच्या सर्जनशीलतेवर झाल्याचे दिसून येते."

आधुनिक सुसंस्कृत स्त्री ही स्वातंत्र मिळवलेली असली तरी तिच्या स्वातंत्र्याला मर्यादा पडतात. तिच्या संवदेनक्षमतेवर तिचे अनुभवविश्व समृध्द होत असले तरी तिच्या स्त्री त्वाचमुळे तिचा अनुभवक्षेत्र विचार मर्यादित राहतो. सर्व भौतिक सुखांची पूर्तता महानगरीय जीवनात असते. त्याचबरोबर महानगरातील गुन्हेगारी, झोपडपट्टीचे बकाल जीवन, समूहजीवनाचे तुटलेपण, एकाकीपण, यांत्रिकता , जीवघेणी सत्तास्पर्धा यामुळे येथील जनजीवन आत्मबधिरतेने ग्रासले गेले आहे. अशा भारलेल्या वातावरणातून, जगण्याची धउपडीतून संवेदना व्यक्त करण्यात स्त्री आणि पुरुष यांचे वेगवेगळे अंगभूत वैशिष्टय प्रत्ययाला येते. म्हणूनच महानगरीयसंवेदन कवींच्या लेखनीतून वेगळे आणि कवयित्रींच्या लेखणीतून वेगळे असे प्रत्ययाला येते.

प्रज्ञा लोखंडे या सुध्दा मुंबईतील उपनगराचा एक संवेदनशील घटक आहेत. त्यामुळे महानगरीय संस्कृतीचे विदारक जीवनदर्शन घडवणारी अशी त्यांची कविता आहे. महानगरीय संस्कृतीच्या दु:खबधीर व माणुसकीशून्य वृत्तीला प्रज्ञा लोखंडे यांनी दाहक उपरोधाने आपल्या काव्यातून प्रकट केले आहे.

महानगराचे अत्यंत विदारक दर्शन प्रज्ञा लोखंडे यांच्या कवितेतून घडते. महानगराचे क्रौर्य, कोलाहल, भूक यांमुळे हे जीवन विद्रुप आणि बकाल झाले आहे. असं अस्थिर जीवन समाजिक विषमता व शोषणाला बळी पडलेलं दिसतं.

"भरगच्च रिक्त शांतता
पसरलय मुलांच्या चेहऱ्यावर
डोळे सताड उघडे कोरे
कसल्याही प्रतिबिंबाशिवाय आणि

कसलाच भुकेकंगालपणा नसलेली भूक."

(खेळ पृ.२४)

समकालीन संस्कृतीचे भान असणारी ही कविता महानगरीय संस्कृन्तीच्या विषमता अधिक स्पष्ट करणारी आहे. आज मुलांना आपण आख्खंच्या आख्खजग त्यांच्यासमोर हजर करतो. पण या महानगराच्या कोलाहलात चेहराच हिसकाऊन घेतला आहे. महानगरीय संवेदानेविषयी रा.ग. जाधव म्हणतात,"आधीचे परिचित प्राकृतिक जग व नवे आधुनिक महानगरीय जग या उभयविध संदर्भात संभ्रमित झालेल्या आणि शहराचे एकतर्फी आकलन करणाऱ्या मनाचे हे भयचकित भावचित्र आहे."

प्रज्ञा लोखंडे यांनी 'ग्लोबल व्हिलेज' मधून स्त्री व्यक्तित्वाच्या काही अंगभूत मर्यादा प्रकट केल्या आहेत. उतरंडीच्या पलीकडे असणारं एक नितांत सुंदर जग कवयित्रीला साकारायचं आहे. पण इतिहासातून मुक्त होण्याचा आटापिटा करायचा नव्हता. आणि भूतकाळाची लाजही बाळगायची नव्हती. या ग्लोबल व्हिलेजमध्ये आदिम आणि अस्खलित पृथ्वीच्या पाठीवर कधीच न संपणारी मनस्वी प्रदीर्घ कविता लिहायची होती. कवयित्री म्हणते

"आपल्याला खेळायचं नव्हतं
भाकरीशी आणि भुकेशी
आपल्याला खेळऊ दयायचं नव्हत
शरीराशी आणि तहानेशी"

(ग्लोबल व्हिलेज पृ ७७)

आता कवयित्री म्हणते की ग्लोबल व्हिलेज तर उभं राहिलं पण वेगळया रुपानं. इथे थोडयाशा सावलीसाठी मोठया भिंती उभा राहिल्या, रुपक आणि प्रतिकांचं छत उभ राहिलं. भितीपोटी फरश्याही बसवण्यात आल्या. तमाम वस्तूंना सुखानं जगण्यासाठी पण कवयित्री म्हणते की ग्लोबल व्हिलेज तर उभं राहिलं पण इथलं स्वत्व संपलं गेलं आणि

"आपल्या हातून
सुटलं जंगल
सुटलं पाणी
सुटली जमीन
तुटली नाती

ग्लोबल व्हिलेजात सापडेल आपल्याला

आपली अस्सल कातडी?"

(ग्लोबल व्हिलेज पृ. ७८)

अशा ग्लोबल व्हिलेजात आपल्याला आपली अस्सल कातडी सापडेल का? असा प्रश्न कवयित्रीला पडतो. कवयित्री प्रज्ञा लोखंडे यांचा हा प्रश्न पुन्हा भाकरी आणि भुकेच्या तत्वज्ञानापाशी येऊन थांबतो.

महानगरीय जगण्यामध्ये प्राकृतिक जगातील निसर्गाचा निखळपणा दुरापास्त होत जातो. महानगरीय संस्कृतीतून निखळपणा दुरापास्त होत जातो. महानगरीय संस्कृतीतून आता आपले स्वत्वच हरवण्याची भिती कवयित्रीला वाटते आहे.

महानगराचे अतिशय विदारक जीवनदर्शन प्रज्ञा लोंखंडे यांनी आपल्या काव्यातून व्यक्त केले आहे. महानगरीय वास्तवाचा विपरीत परिणाम त्यांच्या काव्यातून दिसून येतो.

## व्यक्तिचित्रणे

'उत्कट जीवघेण्या धगीवर' या काव्यासंगह्यातून काही व्यक्तिचित्रेही साकारलेली आहेत. संजीवनी खोजे, दया पवार, हिरा पवार, विठाबाई भाउ मांग नारायणगावकर इ. प्रज्ञा लोखंडे यांनी साकारलेली ही व्यक्तिचित्रणेही मानवतेवरील उत्कट भाग्य दर्शवितात.

संजीवनी खोजे या ही एक आधुनिक मराठी कवयित्री आहेत. त्यांच्याविषयीचा सखीभाव प्रज्ञा लोखंडे यांनी व्यक्त केला आहे. कवयित्री म्हणते

"अथांग एकांतात
मुक्तछंदाला भोगत साहत
तू लिहिलीस
अंतहीन प्रवासाची नैतिक कविता
प्रहराप्रहरागणिक तू होत गेलीस
रिकाम्या चेहऱ्याची स्त्री"

(संजीवनी खोजेसाठी पृ.७५)

अशा कवयित्रीच्या शाश्वत असतेपणासाठी प्रज्ञा लोखंडे प्रार्थना करतात. 'तू माझा बाप आहेस' किंवा 'वीस सप्टेंबर एकोणीसशेशहाण्णव ' हया कविता नात्यांपलीकडचे नाते सांगून जातात. प्रज्ञा म्हणतात

"तू माझा बाप आहेस,
आणि मी तुझी लेक
एवढंच का आहे आपल्यातलं नातं...
या जैविक बिंदूच्या पार मी तुला ओळखते
अन् तू मला....
तू दाखवलास मला
गावकुसाचे तुकडे पाडणारा
भुतकाळाचा लसलसता पट्टा
नि वर्तमानात उचंबळून आलेला
चैत्यभूमीवरचा शाशांत महासागर
मेणबत्यांच्या मंद प्रकाशात
लकाकणारी डोळयांची बुब्बुळं
नि स्वप्नांची गाठोडी घेऊन परतणारे
आपलेच विराट आखूड पाय..."

(तू माझा बाप आहेस.पृ. ८१)

वडिलांच्या मृत्यूनंतर स्वतःच्या आयुष्यात निर्माण झालेल्या पोकळीविषयी प्रज्ञा लोखंडे म्हणतात,"तुझ्न्या मृत्यूचा दाह जगवतोय मला समग्र!"

विठाबाई भाऊ मांग नारायणगावकर या कवितेतून प्रज्ञा लोखंडे यांनी विठाबाईचं घुंगरांशी वेदनेशी सख्खं नातं सांगितलं आहे. अशा घुंगराच्या नात्यामध्ये जन्मतःच काळाजामधून कातीव सुरांची आग आणली जाते. प्रज्ञा लोखंडे म्हणतात

"विठाबाई
ही शोकांतिका नाही फक्त तुझी
बामणाघरी लिवणं
कुणब्याघरी दाणं

आन् आपल्याच बिरादरीच्या रक्तात वाहतंय गाणं

एकदाचं कर मायबाये ठसकेबाज अदाकारी

जितिजागती

बाईपासून सुरु होऊन
बाईपणात संपणारी"

(विठाबाई... पृ.८८,८९)

विशिष्ट जातीत जन्माला येऊनही आणि स्त्री म्हणून जन्माला आल्यामुळे दुःखाचा भोगवटा सरता सरत नाही.

प्रज्ञा लोखंडे यांनी चित्रित केलेली व्यक्तीचित्रणे अतिशय मार्मिक झालेली आहेत. दलित म्हणून स्त्री म्हणून आणि अगतिक -गरजू झालेली गरीब म्हणून तिहेरी शोषण 'विठाबाई' च्या व्यक्तिरेखेतून प्रातिनिधिक होऊन येते.

'उत्कट जीवघेण्या धगीवर ' या काव्यसंग्रहातून प्रज्ञा लोखंडे यांनी स्त्री दुःखाचे मूळ शोधण्याचा प्रयत्न केला आहे. अंतर्यामात जागी होणारी उत्कट धगच प्रज्ञा लोखंडे यांना लिहिती करते. त्यांची प्रतिभा, भावना आणि संवेदना तृष्णेच्या टोकदार बिंदूवर अधिवास करताना दिसते. स्त्रीवेदनेला एक नवे परिमाण देणारी प्रज्ञा लोखंडे यांची कविता आहे. स्त्री-पुरुष संबंधात स्त्रीच्या वाटयाला येणारे, नातसंबंधामधील विसंवाद, एकाकीपणा, थिजलेपणा यासारखे अनुभव प्रामुख्याने व्यक्त करताना प्रज्ञा लोखंडे यांची कविता दिसते. प्रज्ञा लोखंडे यांनी दलित, पीडित या संज्ञांची अर्थकक्षा स्वतःपुरती मर्यादित केली आहे. दलित मनाच्या अपेक्षाभंगाचा दाहक अनुभव त्यांच्या कवितेतून प्रतीत होतो. तसेच महानगरीय संवेदन प्रज्ञा लोखंडे यांच्या काव्यातून प्रखरतेनं जाणवते. या काव्यसंग्रहातील एकूणच रचना अभिव्यक्ती ही स्त्रीवेदनेशी निगडीत आहे असे म्हटले तर चुकीचे होणार नाही.

## निष्कर्ष :

१. महानगरीय संस्कृतीच्या विदारक संवेदना व्यक्त करणारी प्रज्ञा लोखंडे कविता आहे.

२. समकालिन वास्तवाचे भान असणारी ही कविता आहे.

३. सामाजिक विषमता, ाशोषण यांमुळे प्राकृतिक मुक्तपणा हरवला जात असल्याची जाणीव या काव्यातून स्पष्ट होते.

४. ग्लोबलायझेशनमुळे स्थावर मालमत्तेच्या हक्कांनी आणि रक्तसंबंधाच्या नात्यांनी कंगाल होत जाणाऱ्या माणसाला त्याच्या कातडीचे तरी पांघरुण सापडले का अशी भयावह शंका कवयित्री व्यक्त करताना दिसते.

उत्कट जीवघेण्या धगीवर' या काव्यसंगहाविषयी सांगोपांग विश्लेषणात्मक चिकित्सा केल्या नंतर यापुढील प्रकरण पाच मध्ये 'मी भिडवू पाहतेय समग्राशी डोळा' या काव्यसंग्रहाचा चिकित्सक शोध घ्यायचा आहे.

## संदर्भ :

१) डॉ. रविंद्र ठाकूर – 'प्रवाह आणि प्रतिक्रिया' स्वरुप प्रकाशन औरंगाबाद, प्रथमावृत्ती १९९९ पृ. ११८

२) अश्विनी धोंगडे – 'स्त्रीवादी समीक्षा स्वरुप आणि उपाययोजन' दिलीपराज प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती १९९३ पृ.४५

३) रा.ग. जाधव – 'आधुनिक मराठी कवयित्रींची कविता' प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती १९९६ पृ. ११

४) गीता साने – भारतीय स्त्रीजीवन ' मौजप्रकाशन मुंबई प्रथमावृत्ती १८८६ पृ.२०